'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 264 : India's Sustainable Development Goal in 21st Century
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April-2021

# शाश्वत विकासाची ध्येय्ये आणि त्याची भारतातील परिणामकारकता

**प्रा.डॉ.गजानन लोकडीबा शेंडगे**
सहायक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग
महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मनमाड

**प्रस्तावना :-**

आर्थिक विकास हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. कोणत्या अर्थव्यवस्थेत तत्कालीन परिस्थिती बरोबर क्षेत्रीय विकासाची भूमिका महत्वाची असते. विकास या संकल्पनेकडे पारपंरिक दृष्टीकोनातून पाहिले असता आज आधुनिक युगातील विकासाची संकल्पना अधिक विस्तृत होत गेल्याची दिसून येते. मानवाच्या प्रत्यक्ष आयुष्याशी सबंधित आर्थिक विकास या संकल्पनेचा अधिक सखोल विचार आज केला जात आहे. एडवर्ड बार्बियरयांनी आर्थिक विकास स्पष्ट करताना तीन महत्वाची पैलू अधोरेखित केले त्या मध्ये "सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय" या बाबीचा समावेश होतो. आज आधुनिकीकरणाच्या काळात आपल्या देशात आर्थिक विकासाला खुप महत्त्व प्राप्त झाले आहे.

ॲडम स्मिथच्या पूर्वकाळा पासून अर्थशास्त्रज्ञ आर्थिक विकासाच्या समस्येच्या वर आपले विचार मांडत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र झालेल्या अल्पविकसीत देशांनी आर्थिक विकासाकडे विशेष लक्ष पुरविलेले दिसते. सर्व देशा मध्ये विकासाची प्रबळ प्रेरणा निर्माण झाली आहे आणि त्या दृष्टीने ते देश प्रयत्नशील आहेत. विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध देश जसे वशांतर्गत प्रयत्न करतात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा त्यांचे गट क्रियाशील आहेत. एखाद्या ठिकाणाचे दारिद्रय हे अन्य ठिकाणच्या संपन्नतेला धोकादायक ठरू शकते त्यामुळे इंग्लड, अमेरिका या देशांतील गरीब देशाच्या विकासाकडे आपले लक्ष केंद्रित केलेले दिसते.

आधुनिक जगात वावरताना आर्थिक विकासाच्या संकल्पनेच्या सभोवताली एक कडा निर्माण होताना दिसत आहे ती कडा म्हणजे शाश्वतता किंवा चिरस्थाइत्व होय. या शोध निबंधामध्ये शास्वत विकासाची संकल्पना आणि भारतातील शाश्वत विकासातील परीणामकारकता यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

१) निरंतर / शाश्वत विकासाची संकल्पना स्पष्ट करणे

२) शाश्वत विकासाची ध्येय्ये विश्लेषित करणे

३) भारताच्या विकासात शाश्वत विकास ध्येयाची परिणामकारकता अभ्यासणे

आर्थिक विकास या बाबत अनेक तज्ज्य अनके मत मांडताना दिसून येतात, १९९८ साली अर्थशास्त्रातील नोबेल विजेते डॉ.अमर्त्य सेन यांनी असे म्हंटले आहे कि, वृद्धी म्हणजे गरजांची पूर्तता नसून मानव जे जीवन जगतो आणि जी स्वातंत्रे उपभोगतो त्यांचा दर्जा वाढवण्याशी विकासाचा सबंध असला पाहिजे. त्याच्या मते, आर्थिक विकासामुळे व्यक्तीच्या क्षमतेत वाढ झाली पाहिजे. डॉ. सेन यांचा विकासाचा दृष्टीकोन आरोग्य आणि शिक्षणावर मोठा भर देतो. आर्थिक विकास म्हणजे उत्पनातील वाढी बरोबर व्यक्तिगत स्वातंत्र सर्वांना होऊन त्यांच्या गरजांची पूर्तता होणे होय.जागतिक विकासाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने संप्टेबर २००० मध्ये सहस्त्र विकासाची ध्येये निश्चित करून ती २०१५ पर्यत पूर्ण करण्याचे ठरविलेले आहे. तेव्हा संपूर्ण जगाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या आर्थिक विकास संकल्पनेचा अर्थ पहिला.आर्थिक विकासात केवळ उत्पादन वाढच नव्हे तर उत्पादन घटक आणि उत्पादन यांच्या रचनेत होणारे बदल, उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानत होणारे बदल, सामाजिक दृष्टीकोन, सांस्कृतिक वातावरण आणि समाजातील विविध संस्थामध्ये होणारे फेर बदल. थोडक्यात आर्थिक विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय किंवा दरडोई उत्पन्नात वाढ नसून सामाजिक कल्याणात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय.